RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष २, अंक १२६(३)] गुरुवार, सप्टेंबर २९, २०१६/आश्विन ७, शके १९३८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक २५३

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ सप्टेंबर २०१६

अधिसूचना

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३.**

क्रमांक कृपमं. ०७१६/प्र.क्र. १११/२१-स.—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (महा. १९६४ चा २०) याच्या कलम ६० चे पोट-कलम (१) व पोट-कलम (२) चे खंड (ख) आणि (प) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) नियम, १९६७, यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम ६०, पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

१. या नियमांना, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम, २०१६ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) नियम, १९६७ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) यातील नियम ४ ब मधील

(क) उप नियम (३) मध्ये :—

(एक) " रुपये पन्नास हजार " या मजकुराऐवजी " रुपये एक हजार " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) " रुपये पंधरा हजार " या मजकुराऐवजी " रुपये पाचशे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ख) उप नियम " (४) " ऐवजी खालील उप नियम दाखल करण्यात येईल.

" (४) संपूर्ण राज्यातील किंवा एकापेक्षा अधिक महसुली विभागातील कार्यासाठी थेट पणनच्या लायसन्ससाठी अर्ज करताना, संचालकाकडे पाच लाख रुपये एवढ्या किमतीची बँक हमी जमा करण्यात येईल, आणि विविध महसुली विभागांसाठी खालील तक्त्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे बँक हमी असेल :—

तक्ता

| अ.क्र. | महसुली विभाग | बँक हमीची रक्कम (रुपये लाखात) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | कोकण | ५.०० |
| २ | पुणे | ५.०० |
| ३ | नाशिक | ५.०० |
| ४ | नागपूर | ३.०० |
| ५ | अमरावती | २.०० |
| ६ | औरंगाबाद | २.०० |

परंतु, शासकीय संस्था व स्थानिक प्राधिकरणे यांना या उप नियमातून सूट देण्यात येईल. ".

३. मुख्य नियमांच्या नियम ६ मधील उप नियम (३अ), मध्ये " पाचशे " या मजकुराऐवजी " शंभर " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

४. मुख्य नियमांच्या नियम १२ मध्ये " जाहीर लिलाव " या मजकुरानंतर " किंवा ई-लिलावाद्वारे ई-पणन " हा मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

का. गो. वळवी,
शासनाचे उप सचिव.